दैनिक
MAHILA SANVAD
# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर ▌कार्यकारी संपादक : विद्या जाधव ▌उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 274, Marathi Daily Monday, Date - 04 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २७४ वा | मराठी दैनिक | सोमवार दि. ०४ मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# पवना नदीत पुण्याच्या तिघांचा बुडून मृत्यू

## फिरायला गेले, पण काळाने गाठलं तीन तरुणांचा पाण्यात अंत

**पुणे । प्रतिनिधी**

उन्हाळ्याची सुट्टी आणि विकेंडच्या निमित्ताने मावळ परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पुण्यातील तीन तरुणांचा पवना नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मावळ तालुक्यातील थूगाव परिसरातील पवना नदी पात्रात ही घटना घडली आहे. प्रथमेश शिंदे, अश्विन भालेराव आणि आयान शेख अशी मृत तरुणांची नावं आहेत. हे तिघेही पवना धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. याचदरम्यान ही घटना घडली आहे. सध्या वाढत असलेल्या उकाड्यामुळे त्यांना नदीच्या पात्रात पोहण्याचा मोह झाला. मात्र, पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ, शिवदुर्ग मित्र मंडळ यांनी तातडीने बचाव कार्य सुरू केलं. मात्र या तरुणांना वाचवण्यात यश आलं नाही. या दुर्दैवी घटनेत या तिघांचाही मृत्यू झाला आहे, त्यांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले आहेत. पर्यटनासाठी आलेल्या या तरुणांवर काळाने घाला घातल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. वाढत्या उष्णतेमुळे नदी-नाल्यात पोहताना पर्यटकांनी सावधगिरी बाळगावी, असं आवाहन या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, विकेंड असल्यामुळे हे तरुण मावळ परिसरात फिरण्यासाठी आले होते. मात्र तिथे आपल्यासोबत काय घडणार आहे, याची थोडी सुद्धा कल्पना या तरुणांना नव्हती. कडाक्याच्या उन्हामुळे



त्यांना नदीच्या पाण्यात पोहोण्याचा मोह झाला आणि इथेच मोठा घात झाला. हे तरुण नदीत उतरले मात्र पाण्याचा अंदाज न आल्यानं त्यांचा बुडून मृत्यू झाला आहे. घटना लक्षात आल्यानंतर घटनास्थळी बचाव कार्य सुरू करण्यात आलं. मात्र त्यांना वाचवण्यात अपयश आलं. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान दुसरीकडे मुंबईतून देखील अशीच एक घटना समोर आली आहे. मुंबईतील अक्सा चौपाटीवर शाळेला सुट्टी लागल्यानंतर तीन मुलं समुद्रात अंघोळीसाठी गेली होती, मात्र ही मुलं अचानक बुडू लागली, ही घटना लक्षात येताच जीवरक्षक नथुराम सूर्यवंशी आणि त्यांच्या टीमने घटनास्थळी रेस्क्यू ऑपरेशन राबवलं, या मुलांना वाचवण्यात यश आलं आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये अशा घटनांमध्ये राज्यात दिवसे नं दिवस मोठी वाढ होत असल्याचं पहायला मिळत आहे.

## थोडक्यात...

### नसरापूर प्रकरण तापलं: प्रवीण तरडे यांची आक्रमक प्रतिक्रिया, 'एन्काऊंटरच हवा'

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार झाल्यानंतर तिची हत्या करण्यात आली आहे. या घटनेनंतर नातेवाईक आक्रमक झाले आहेत. या घटनेनंतर ग्रामस्थांसह नातेवाईक आक्रमक झाले आहेत. पुण्याच्या नवले पुलावर आंदोलकांनी ठिय्या मांडला आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही, आरोपीला शिक्षा होत नाही तोपर्यंत इथून हलणार नाही अशी भूमिका चिमुरडीच्या नातेवाईकांनी घेतली होती. दरम्यान, या घटनेवर मराठी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ दिग्दर्शक आणि अभिनेते प्रवीण तरडे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. आरोपी असलेल्या नराधमाचा एन्काऊंटर झालं तरच हे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचं आहे अशी प्रतिक्रिया प्रवीण तरडे यांनी दिली आहे.

नसरापूर लैंगिक अत्याचार प्रकरणाबाबत अभिनेते प्रवीण तरडे आक्रमक झाले आहेत. नराधमाचा एन्काऊंटर झालं तरच हे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांचा विचारांचं आहे असं म्हणत त्यांनी फेसबुक पोस्ट केली आहे. एन्काऊंटर झालं नाही तर भोरच्या मावळ्यांनी कायदा हातात घ्यावा, अशी आक्रमक पोस्ट प्रवीण तरडे यांनी केली आहे.

भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये शुक्रवारी, १ मे रोजी एका ४ वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार करून तिची हत्या केली. नराधमाला पोलिसांनी अटक केली असली तरी चिमुकलीचे नातेवाईक आणि ग्रामस्थ प्रचंड संतापले. त्यांनी पुण्यातील नवले पुलाजवळ शनिवारी संध्याकाळी साडेसहा वाजल्यापासून ठिय्या आंदोलन सुरू केलं. चिमुकलीचा मृतदेह रुग्णवाहिकेत ठेवून त्यांनी ठिय्या आंदोलन केलं.

नसरापूर आंदोलकांनी ऐन गर्दीच्या वेळी पुणे-बंगळुरू महामार्ग रोखून धरल्यामुळे पुण्यात मोठी वाहतूक कोंडी झाली. आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी या आंदोलकांनी केली. या आंदोलकांची समजूत काढण्यासाठी पुणे पोलीस आयुक्त दाखल झाले. त्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आंदोलकांनी माघार घेण्यास नकार दिला.

नसरापूरच्या चिमुकलीला न्याय द्या आणि नराधमाला फाशी द्या या मागणीसाठी लोकांनी आंदोलन केलं. यासाठी त्या चिमुकलीचा मृतदेहही त्या ठिकाणी आणण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चिमुकलीच्या कुटुंबाला फोन करावा आणि नराधमाला फाशी देत असल्याचं जाहीर करावं, अशी मागणी आंदोलकांनी केली. आंदोलकांच्या आक्रमकतेमुळे या ठिकाणी मोठी गर्दी झाल्याचं दिसून आलं. परिणामी नवले पूलाच्या दोन्ही बाजूने वाहतूक कोंडी झाली. सुमारे चार तास हे आंदोलन सुरू होतं. यावेळी पुण्याचे आयुक्तही त्या ठिकाणी आले आणि त्यांनी आंदोलकांशी, चिमुकलीच्या कुटुंबीयांशी चर्चा केली.

# पतीसमोरच दुर्दैवी अंत; सेल्फीचा नाद ठरला जीवघेणा

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरातून एक हृदयद्रावक अपघाताची बातमी समोर आली आहे. यात पतीच्या डोळ्यादेखत पत्नीचा दुर्घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

फोटो काढण्याच्या नादात पाय घसरून चेहडी बंधाऱ्यातील पाण्यात बुडून पत्नीचा मृत्यू झाला आहे.



तर पतीने चेहडी बंधाऱ्यावर काढलेला फोटो अखेरची आठवण ठरला आहे. पती समोरच फोटो काढत असताना बंधाऱ्याचा काठ समजू न आल्याने महिला थेट पाण्यात कोसळली. काही कळायच्या आत हि दुर्घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. तर बचावासाठी कुणीही उपलब्ध नसल्याने या दुर्घटनेत महिलेचा दुर्दैवी अंत झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गीता दास असे पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या ५५ वर्षीय महिलेचे नाव आहे.

सुट्टीमुळे गोवा येथे जाण्यासाठी आणि घरातील निर्माल्य टाकण्यासाठी दास दांपत्य चेहडी बंधाऱ्यावर आले होते. यावेळी मोबाईलमध्ये फोटो काढत असताना हि दुर्दैवी घटना घडलीय. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली असून सध्या पोलीस या प्रकरणाचा पुढील कारवाई करत आहे.

# भररस्त्यात फेरीवाल्याची चाकूने हत्या

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील मुलुंड परिसरात एका २४ वर्षीय फेरीवाल्यावर चाकूने वार करत त्याला संपवण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पत्नीशी असलेल्या अनैतिक संबंधाच्या रागातून हे प्रकरण घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, मुंबई पोलिसांनी या प्रकरणी ४२ वर्षीय आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संतोष बिंद (वय २४) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो मुलुंड परिसरात फेरीवाल्याचे काम करत होता. शनिवारी भररस्त्यात संतोषवर राकेश धिवार (वय ४२) याने चाकूने वार केले. या हल्ल्यात संतोष गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.



आरोपी राकेश धिवार याला संशय होता की, मृत संतोष बिंद याचे त्याच्या पत्नीशी अनैतिक संबंध आहेत. यावरून दोघांमध्ये यापूर्वीही वाद झाले होते. घटनेच्या दिवशी संतोषने राकेशला काहीतरी बोलून चिथावणी दिली, ज्यामुळे राकेशचा संयम सुटला. रागाच्या भरात त्याने सोबत आणलेल्या चाकूने संतोषवर हल्ला करून त्याला संपवले.

या थरारक घटनेनंतर परिसरात घबराटीचे वातावरण पसरले होते. मात्र, मुंबई पोलिसांनी वेगाने हालचाली करत आरोपी राकेश धिवार याला अटक केली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. भररस्त्यात घडलेल्या या घटनेमुळे मुलुंडमधील सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# ११ वर्षीय मुलीचा विनयभंग, आरोपी अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून घडलेल्या अल्पवयीन मुला-मुलींवरील अत्याचारांच्या घटनांनी संपूर्ण जिल्हा सुन्न झाला आहे. नसरापूर आणि म्हाळुंगे येथील धक्कादायक घटना ताज्या असतानाच, आता चाकण जवळील बिरदवडी येथे ११ वर्षीय मुलीचा विनयभंग झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी उत्तर चाकण पोलिसांनी ३२ वर्षीय परप्रांतीय आरोपीला तातडीने बेड्या ठोकल्या आहेत.




शनिवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास पीडित ११ वर्षीय मुलगी घरात कोणी नसल्याने घराला कुलूप लावून आपल्या काकाच्या घरी जात होती. यावेळी मुलगी एकटी असल्याचे पाहून आरोपी अरुण गयाप्रसाद मिश्रा (वय ३२) याने घराच्या कंपाऊंडमध्ये प्रवेश केला आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या चिमुकलीने अत्यंत धैर्याने तेथून पळ काढल्याने ती बजावली. मुलीने हा प्रकार आपल्या वडिलांना सांगितल्यानंतर, वडिलांनी तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेतली.

घटनेचे गांभीर्य ओळखून उत्तर चाकण पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम राबवून आरोपी अरुण मिश्रा याला ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

पुणे जिल्ह्यात एकामागून एक घडणाऱ्या या घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. भोर तालुक्याच्या नसरापूर येथे १ मे रोजी ४ वर्षांच्या मुलीवर ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार करून तिची हत्या केली. या विरोधात शनिवारी रात्री नवले पुलावर ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करण्यात आले. तर चाकणच्याच म्हाळुंगे दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ३ वर्षांच्या चिमुरड्यावर अत्याचार करून त्याची हत्या करण्यात आली. या प्रकरणी बिहारमधील एका १६ वर्षीय मुलाला ताब्यात घेण्यात आले आहे. आता पुन्हा चाकणमध्येच अकरा वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याचा प्रकार उघडकीस आलाय. या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. घटनेतील आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# भरदिवसा तरुणाचा कोयत्याने निर्घृण खून

**सोलापूर । प्रतिनिधी**

गेल्या काही काळापासून राज्यातील गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेक ठिकाणी खून-मारामारीच्या घटना समोर आल्या आहेत.

असातच आता तरूणाच्या हत्येने सोलापूर हादरलं आहे. शहरातील ७० फूट रोडवर ५ जणांच्या टोळक्याने एका तरूणाचा भरदिवसा खून केला आहे. या घटनेचा अंगावर काटा आणणार व्हिडिओही समोर आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. सोलापुरात भरदिवसा नेमकं काय घडलं याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

सोलापूरमध्ये वर्चस्ववादातून भर रस्त्यात तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. सुरेश श्रीराम असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. सुरेशला ५ आरोपींनी भर रस्त्यात गाडी आडवून कोयत्याने हल्ला केला. त्यानंतर त्याची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली आहे. ही धक्कादायक घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पूर्ववैमनस्यातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. आता पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन तपासाला सुरुवात केली आहे.



सोलापूर शहरातील ७० फूट रोडवर सुरेश श्रीराम याची दुचाकी अडवत त्याच्यावर कोयत्याने हल्ला केला. पाच ते सहा जणांच्या हल्ल्यामुळे सुरेशला प्रतिकारही करता आला नाही. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे त्याचा अवघ्या काही सेकंदांमध्ये जीव गेला. वराह पालनावरून आरोपी आणि मयत सुरेशमध्ये पूर्वीपासून वाद होता अशी माहिती समोर आली आहे. तसेच मृत सुरेश श्रीरामवर एकूण १० गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. सध्या ६ पैकी ५ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून या प्रकरणाच्या तपासाला सुरूवात केली आहे.

# उष्माघाताचा कहर! नागपूर, यवतमाळ, लातूरमध्ये मृत्यूंची मालिका

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर शहरात विविध पोलीस स्टेशन हद्दीत तिघांचा मृत्यू उष्माघाताने झाल्याचा संशय आहे. सदर परिसरात ५८ वर्षीय,यशोधरानगर परिसरात ६० वर्षीय, आणि गणेशपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत आस्था निवारा येथे वास्तव्यास असलेल्या ६५ वर्षीय पुरुष बेशुद्धावस्थेत आढळले. तिघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. हे तीनही मृत्यू उष्माघाताने झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र मृत्यूचे नेमके कारण पोस्ट मॉर्टम नंतरच स्पष्ट होणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील अजंती पारधी बेडा गावात एका ६ वर्षीय चिमुकलीचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या गावात पाण्यासाठी भीषण परिस्थिती असल्याने चिमुकलीला पाण्यासाठी अर्धा किलोमीटर पायपीट करत जावे लागले. त्यानंतर तिचा मृत्यू झाला. त्यामुळे हा उष्माघाताचा बळी की पाणी टंचाईचा असा सवाल उपस्थित केला जात आहे.

नेर तालुक्यातील अजंती पारधी बेडा हे गाव ५६ कुटुंबाचे ३५० लोकसंख्या असलेले आहे. फासेपारधी समाजाचे गाव आहे. या गावातील प्रत्येक घरासमोर नळचे कनेक्शन आहे. मात्र या नळाला पाणी येत नाही. ८ दिवस आड पाणी पुरवठा केला जात असल्याने इतर दिवस गावकऱ्यांना पाण्यासाठी अर्धा किलोमीटर पायपीट करावी लागते. याच गावातील अनवी अनाडी भोसले ही चिमुकली दुपारच्या सुमारास आपल्या घरून डोक्यावर कळशी घेऊन पाण्यासाठी गेली. मात्र परत आलीच नाही रस्त्यावर चक्कर पडून तिचा मृत्यू झाला. अनवी हिला कुठलाही आजार न्हवता शिवाय तिला मळमळ उलटी झाली नाही त्यामुळे तिचा नेमका मृत्यू कसा झाला याचा शोध आरोग्य यंत्रणा घेत आहे. अनवी हिचे शवविच्छेदन न झाल्याने तिचा मृत्यू कसा याचा शोध कसा लावावा असा प्रश्न सुद्धा आरोग्य यंत्रणेपुढे आहे . गावातील हे दिलेले नळ पाण्याच्या टाकी पासून अगदी काही अंतरावर आहे मात्र या नळातून हवे शिवाय काही येत नाही शोभेच्या वस्तू हे नळाचे कनेक्शन झाले आहे. ८ दिवस आड पाणी पुरवठा या नळातून होतो त्यामुळे रोजच्या जगण्याचा प्रश्न असलेल्या या पारधी समाजाला पाण्यासाठी सुद्धा भटकंती करावी लागत आहे



एका चिमुकलीच्या मृत्यूनंतर तालुक्यातील प्रशासन खलबळून जागे झाले खरे मात्र आधीच पाणी पुरवठा सुरळीत झाला असता तर एका चिमुकली चा जीव वाचला असता चिमुकलीचा जीव गेल्या नंतर आता वराती मागून घोडे अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे. लातूर जिल्ह्यातल्या औसा तालुक्यातील भुसनी गावात उष्माघाताने एकाचा मृत्यू झाला असा संशय व्यक्त केल्या जात आहे. लक्ष्मण कांबळे ( वय -५५) असं मृत्यूमुखी पडलेल्या मजूराचे नाव आहे. कामावरून घरी परत असताना चक्कर येऊन कोसळल्या नंतर त्यांचा थोड्याच वेळात मृत्यू झाला. उष्माघाताने त्याचा मृत्यू झाल्याचा संशय आहे.

## संपादकीय...

### मावळमध्ये तीन तरुण बुडाले

मावळ तालुक्यातील पवना नदी परिसरात घडलेली तीन तरुणांच्या बुडून मृत्यूची घटना ही केवळ एक दुर्दैवी अपघात नाही, तर समाजाने आणि प्रशासनाने गांभीर्याने घेण्यासारखी इशारा देणारी घटना आहे. उन्हाळ्याच्या कडाक्यामुळे आणि सुट्टीच्या पार्श्वभूमीवर निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्यासाठी बाहेर पडणाऱ्या युवकांमध्ये वाढ झाली आहे. मात्र, या आनंदाच्या शोधात जीव धोक्यात घालण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे. पुण्यातील प्रथमेश शिंदे, अश्विन भालेराव आणि आयान शेख या तिघा तरुणांचा मृत्यू हा एका क्षणातील चुकीच्या निर्णयामुळे झाला. पाण्याचा वेग, खोली किंवा प्रवाह याचा योग्य अंदाज न घेता नदीत उतरणे किती घातक ठरू शकते, याचे हे जिवंत उदाहरण आहे. ग्रामीण भागातील नद्या, तलाव किंवा धरण परिसर हे वरवर शांत दिसले तरी त्यांच्या तळाशी असलेली खोली, भोवरे आणि अचानक बदलणारा प्रवाह हे मोठे धोके निर्माण करू शकतात. या घटनेत स्थानिक ग्रामस्थ आणि शिवदुर्ग मित्र मंडळाने तत्काळ मदतकार्य सुरू केले, मात्र त्यांना यश आले नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, अपघात घडल्यानंतरचे प्रयत्न महत्त्वाचे असले तरी त्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहे ती पूर्वतयारी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना. प्रत्येक पर्यटनस्थळी प्रशिक्षित जीवरक्षक, चेतावणी फलक आणि धोकादायक भागांची स्पष्ट चिन्हांकन व्यवस्था असणे अत्यावश्यक आहे. दुसरीकडे, अक्सा चौपाटी येथे घडलेली घटना आशेचा किरण दाखवते. जीवरक्षक नथुराम सूर्यवंशी आणि त्यांच्या पथकाने वेळेवर केलेल्या धाडसी प्रयत्नांमुळे तीन मुलांचे प्राण वाचले. यावरून प्रशिक्षित बचाव पथकांची उपस्थिती किती महत्त्वाची आहे, हे अधोरेखित होते. सध्या राज्यभरात वाढत्या उष्णतेमुळे अशा घटनांची संख्या वाढताना दिसते आहे. नदी, तलाव किंवा समुद्रात पोहण्याचा मोह होणे स्वाभाविक आहे, पण त्यामागे असलेला धोका ओळखणे तितकेच गरजेचे आहे. युवकांनी साहस आणि निष्काळजीपणा यातील सीमारेषा ओळखली पाहिजे. मित्रांच्या दबावाखाली किंवा उत्साहाच्या भरात घेतलेले निर्णय कधी कधी आयुष्यभराचा पश्चात्ताप ठरतात.

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये नारीशक्तीचा सहभाग महत्त्वाचा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी नारीशक्तीचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. देशाच्या विकास वाटचालीत नारीशक्तीचे योगदान महत्त्वाचे असून ही नारीशक्ती ज्यावेळी संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल, तेव्हाच भारत पूर्णपणे विकसित होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा शब्दात नारी शक्तीचा सन्मान करीत देशात सर्वात पहिल्या एक कोटी लखपती दीदी महाराष्ट्रातच झाल्या पाहिजे, असे आवाहन यावेळी केले.



वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स संकुलातील एमएमआरडीए मैदानावर आयोजित महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत मंत्री जयकुमार गोरे, कौशल्य विकास , उद्योजकता व रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, ग्राम विकास व पंचायतराज राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मुख्य परिचलन अधिकारी श्री. ओसवाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नारीशक्तीच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत. त्याचा लाभ महिलांना होत आहे. राज्यात ५० लक्ष लखपती दीदी तयार होत आहे. महिलांशी संबंधित असलेल्या सर्व यंत्रणा 'पावर हाऊस' आहे. या महिला शक्तीच्या योगदानातून शासनाने सुरू केलेली ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम यशस्वी करायची आहे. उमेदच्या माध्यमातून यासाठी एक योजना तयार करण्यात यावी. या योजनेच्या माध्यमातून महिला बचत गटांना नर्सरी तयार करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यात येईल. नर्सरी तयार करण्यापासून झाडे लावणे आणि त्याची निगा राखणे यासाठी पण खर्च शासन स्तरावरून देण्यात येईल. अशा महिला बचत गटांना वृक्ष लागवडीतून व्यावसायिक स्वरूपात मिळकत देखील होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाशी महालक्ष्मी सरस प्रदर्शनाची तुलना होऊ शकते, अशा प्रकारचे स्वरूप या प्रदर्शनाच्या आयोजनाला देण्यात आले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात संबंधित विभाग आणि यंत्रणेच्या माध्यमातून महिला बचतगटांची मोठी चळवळ सुरू आहे. या चळवळीशी कोट्यावधी महिला जोडल्या गेल्या आहेत. बचतगटांच्या माध्यमातून अनेक महिलांनी आपली उत्पादने तयार केली असून त्यासाठी बाजारपेठही मिळवली आहे. कुटुंबासोबतच बचतगट सक्षम करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले काम या महिलांनी केले आहे.

महालक्ष्मी सरस प्रदर्शन महिला बचत गटांच्या उत्पादनासाठी हक्काची बाजारपेठ आहे. सर्वसाधारण महिलांपासून ते अन्न तंत्रज्ञानात शिक्षण घेतलेल्या महिलांपर्यंत महिला बचत गटांच्या माध्यमातून उत्पादित उत्पादने महालक्ष्मी सरस प्रदर्शनामध्ये उपलब्ध असतात. व्यावसायिक स्वरूपामध्ये पॅकेजिंग केलेल्या वस्तू या प्रदर्शनामध्ये पाहायला मिळतात. यावरून कुठल्याही स्पर्धेसाठी महिला बचतगट आता सज्ज असल्याचे दिसत आहे.

देशात ई-कॉमर्स मोठ्या वेगाने वाढत आहे. उमेद मार्ट या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून महिला बचतगटांच्या उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर १००० पेक्षा जास्त वस्तू आहेत. राज्यातील नागरिकांनी उमेद मार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरूनच खरेदी करावी, असे आवाहनही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महिला बचत गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी २० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉलचे काम सुरू करण्यात आले आहे. उर्वरित १६ जिल्ह्यांमध्ये मॉलचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. काही वर्षात उमेद मॉलचे जाळे तालुका स्तरापर्यंत विस्तारित करायचे आहे, असेही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

प्रास्ताविकात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, महिलांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ महालक्ष्मी सरसमधून मिळाली आहे. महिला बचत गटांच्या उत्पादित वस्तूंचे देशातील हे सर्वात मोठे प्रदर्शन आहे. महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्याचे काम होत आहे. गाव खेड्यातील महिला सक्षमपणे पायावर उभ्या राहत आहे. राज्यात महिला बचत गटांच्या माध्यमातून 'उमेद' ३९ हजार ५५८ गाव खेड्यात पोहोचले आहे. महिला बचत गटांच्या चळवळीमुळे ६४ लाख कुटुंबाना लाभ मिळाला आहे. राज्यात सध्या ६ लक्ष ६८ हजार बचत गट आहेत. महिला बचत गटांसोबतच राज्यात ३३१ महिला शेतकरी कंपन्या आहेत.

विविध योजनांच्या आणि यंत्रणांच्या माध्यमातून महिलांना कर्ज वितरित करण्यात आले आहे. मात्र कर्ज परत फेडण्याची महिलांची वृत्ती त्यांचे वेगळेपण निदर्शनास आणते. त्यामुळे महिलांसाठी दिलेल्या कर्जाचा एनपीए १ टक्क्यांच्यावर नाही, असेही ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले. प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आभार मानले.

सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी प्रदर्शनातील स्टॉलला भेट दिली. काही स्टॉल धारकांशी संवादही साधला. कार्यक्रमादरम्यान उमेदच्या माध्यमातून ६८ यशकथांवर आधारित निर्मित पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.

तसेच उमेद मार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर १००० वस्तू सूचीबद्ध करण्यात आल्या. कार्यक्रमाला महाराष्ट्रातून आलेल्या असंख्य महिला उपस्थित होत्या.

## ताराबंदर ग्रामस्थांकडून वनमंत्री गणेश नाईक यांची भेट; अनधिकृत कामांमुळे मासेमारी हक्कांना धोका, तात्काळ कारवाईचे आश्वासन

**रायगड । प्रतिनिधी**

ताराबंदर ता. मुरुड, जि. रायगड येथील पारंपरिक मच्छीमारांवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भात ताराबंदर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी मा. आमदार श्री. रमेश दादा पाटील (राष्ट्रीय अध्यक्ष, कोळी महासंघ) यांची भेट घेण्यात आली. पिढ्यान्पिढ्या स्थानिक कोळी बांधवांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहासाठी, पोटापाण्यासाठी चाललेल्या मासेमारी धंद्यावरील हक्कांना धोका निर्माण झाला असून, यासाठी न्याय मिळालाच पाहिजे, असा ठाम आग्रह भेटीदरम्यान करण्यात आला.



ताराबंदर परिसरात सुरू असलेल्या अनधिकृत कामांमुळे स्थानिक मच्छीमारांच्या पारंपरिक हक्कांवर गदा येत असल्याची सविस्तर माहिती आमदार पाटील यांना देण्यात आली. समुद्रकिनाऱ्यावरील वहिवाटीचे रस्ते बंद होणे, मासेमारी व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागांवर अडथळे निर्माण होणे आणि यामुळे मच्छीमारांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यासंदर्भातील सविस्तर लेखी निवेदनही सादर करण्यात आले. सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. आमदार श्री. रमेश दादा पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पारंपरिक कोळी बांधवांवर होत असलेले अन्याय दूर करण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

तसेच, आमदार पाटील यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मा. वनमंत्री श्री. गणेश नाईक यांची देखील भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान स्थानिक मच्छीमारांवर होत असलेल्या अन्यायाची माहिती देण्यात आली असून, पारंपरिक मच्छीमारांचे हक्क अबाधित राखण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मा. वनमंत्री महोदयांनी दिले.

यावेळी आमदार तथा कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. रमेश दादा पाटील, कोळी महासंघाचे कोकण प्रभारी व ताराबंदर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र वरसोलकर, सचिव श्री. प्रतिक प्रमोद कणगी तसेच हरेश भगत, रंजन भोईर, रमेश पाटील, महादेव, मच्छिंद्र कुलाबकर, नागोजी, हरिश्चंद्र मोती, चिंतामणी वाघरे, नितेश वायरे, जीवन परदेशी, मनोहर कानुगोजे, ललीत नागोजी, प्रशांत नागोजी, वैभव (भाऊ) भोईर, कोटकर अलंकार भोईर व ताराबंदर ग्रामस्थ उपस्थित होते.

ताराबंदर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने या सकारात्मक प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले असून, पारंपरिक मच्छीमारांच्या हक्कांचे संरक्षण व न्याय मिळवण्यासाठी पुढील पाठपुरावा सुरू ठेवण्यात येणार असल्याचे मंडळाने स्पष्ट केले आहे. स्थानिक कोळी समाजाच्या शतकोनी हक्कांना न्याय मिळावा, यासाठी आंदोलनाची तयारी असल्याचेही मंडळाने सूचित केले

## सामाजिक कार्यकर्त्या संगीता ढेरे यांचा 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' पुरस्काराने गौरव

**रायगड । प्रतिनिधी**

महिला व बालकल्याण क्षेत्रात केलेल्या उत्तुंग कार्याची दखल घेत, 'श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता' संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता सचिन ढेरे यांना सन २०२०-२१ चा राज्य शासनाचा जिल्हास्तरीय 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. १ मे, महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष सोहळ्यात हा सन्मान करण्यात आला.



राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांच्या शुभहस्ते संगीता ढेरे यांना सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेशजी वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. संगीता ढेरे या सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असतात. 'श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता' संस्थेच्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणाचे मोठे जाळे विणले आहे. आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे आणि विशेषतः आदिवासी वाड्यांवरील मुलांच्या शिक्षणासाठी व आरोग्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या याच सामाजिक बांधिलकीमुळे यापूर्वी त्यांना 'रायगड भूषण' आणि 'द्रोणागिरी भूषण' यांसारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आता शासनाचा अहिल्यादेवी होळकर पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव झाला असून, सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## 'हाऊसिंग स्टॉक'मधील घरांच्या प्रभावी उपयोगासाठी धोरण तयार करावे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधा निर्मितीचे प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांच्या पूर्णत्वामुळे मुंबईचे दळणवळण अधिक गतिमान होणार आहे. या विकास प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांकरिता घरांची व्यवस्था करण्यात येते. अशा 'हाऊसिंग स्टॉक'मधील घरांच्या प्रभावी उपयोगासाठी धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत बैठक झाली. बैठकीस केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विविध जागांवर विकासाची कामे सुरू आहेत. तसेच भविष्यातही विविध पायाभूत सुविधांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. केंद्रीय यंत्रणांशी समन्वय साधत अशा जागांचा संयुक्त सर्वे करण्यात यावा. विकास कामांकरिता लागणाऱ्या जमिनींबाबत केंद्र शासनाशी संबंधित बाबींकरिता संपूर्ण जागांचा एकच प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात यावा. मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या अंतर्गत असलेल्या जागांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्देशानुसार पाठपुरावा करून प्रकरणे तातडीने निकाली निघण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करावा.

छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील शेंद्रा- बिडकीन उद्योग क्षेत्रात नवीन उद्योग क्षेत्रासाठी जमिनीची आवश्यकता आहे. नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन सोबत येथील जमिनीच्या उपलब्धतेबाबत पाठपुरावा करावा. दिघी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना गती द्यावी. मुंबई महापालिकेने शताब्दी आणि भगवती रुग्णालयामध्ये दर्जेदार रुग्णसेवेसाठी आधुनिक यंत्र सामुग्री, स्वच्छता आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यावर भर द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी दिले. मुंबईत सुरू असलेल्या गावठाणांचे रेखांकन गतीने पूर्ण करावे. रेखांकन पूर्ण झाल्यानंतर गावठाणामधील शेवटच्या नागरिकाला नागरी सुविधा मिळतील, याची खबरदारी घ्यावी. गोराई भागात दिल्ली येथील भारत मंडपम च्या धर्तीवर ' कन्व्हेंशन सेंटर' निर्माण करण्याकरिता कार्यवाही करावी. यासाठी बृहत नियोजन आराखडा बनवावा. या केंद्राचा उपयोग व्यावसायिक स्तरावर होईल, अशा पद्धतीचे नियोजन करण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल म्हणाले, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या माध्यमातून कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येत आहे. यामध्ये उत्तर मुंबईमधील शिंपोनी कौशल विकास केंद्र तयार असून ते कार्यान्वित करावे. कांदिवली भागामध्ये क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती पीपीपी तत्त्वावर करण्यात यावी. स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाच्या वतीने निर्माण करण्यात येणाऱ्या क्रीडाविषयक पायाभूत सुविधांमध्ये स्थानिक क्रीडा विभागाच्या प्रशासनाने सक्रिय सहभाग घ्यावा. या भागातील मैदानांवर क्रीडाविषयक स्पर्धा आयोजित करण्यावर भर देण्यात यावा. केंद्र शासनाने देशाला ३१ मार्च २०२९ पर्यंत ' ड्रग फ्री इंडिया' करण्याचा संकल्प केला आहे. या मोहिमेत पोलीस प्रशासनाने आपले योगदान द्यावे.

बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्य सचिव (गृह) मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, पोलिस आयुक्त देवेन भारती, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, एमआयडीसी मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसू, एमएमआरडीए अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते. तसेच बैठकीत मुंबई महानगर पालिका आयुक्त आश्विनी भिडे यांनी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे सहभाग घेतला.

## इयत्ता १२ वी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षणमंत्र्यांकडून अभिनंदन

**मुंबई । प्रतिनिधी**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षेत यश मिळविलेले विद्यार्थी, त्यांचे पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी अभिनंदन करीत विद्यार्थ्यांनी आपली आवड आणि कल विचारात घेऊन पुढील वाटचाल करावी, या परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही त्यांनी हताश न होता पुन्हा नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे व यश संपादन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी- मार्च २०२६ मध्ये आयोजित उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेचा निकाल शनिवार दि. २ मे २०२६ रोजी मंडळाच्यावतीने जाहीर करण्यात आला.

यावाबत शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, बारावीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीला आज फळ मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांच्या पालकांचा त्याग आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे.



या परीक्षेतील यशानंतर विद्यार्थ्यांना आपल्या आवडीनुसार विविध क्षेत्रांमध्ये वाटचाल करण्याचा मार्ग खुला झाला आहे. पुढील उच्च शिक्षणासाठी ज्या ज्या क्षेत्रात विद्यार्थी जातील त्या क्षेत्रात महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे. तुम्ही उद्याच्या भारताचे आधारस्तंभ आहात, तुमच्या कर्तृत्वातून एक समृद्ध समाज घडवण्याचे स्वप्न आपण सर्व मिळून पूर्ण करूया, अशा शब्दांत मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांचा गौरव केला आहे. ही परीक्षा अंतिम ध्येय नसून, यामुळे ज्या विद्यार्थ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, त्यांनी खचून न जाता नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे आणि यश संपादन करावे. हा निकाल विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य ठरवू शकत नाही. अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी जून- जुलै महिन्यात पुन्हा परीक्षा होतील. शासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या विद्यार्थ्यांना दिलासाही दिला.

या परीक्षेत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य, व व्यवसाय अभ्यासक्रम व आयटीआय या शाखांसाठी एकूण १४,४४,७१३ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,३३,०५८ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १२,८६,८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्णतेची ही टक्केवारी ८९.७९ आहे. सर्व विभागीय मंडळांमधून कोकण विभागाचा निकाल ९४.१४ टक्के इतका सर्वाधिक आहे. कोकण विभागातील ९४.१४ टक्के, पुणे ९१.२५ टक्के, अमरावती ९०.९२ टक्के, नाशिक ९०.७२ टक्के, मुंबई ९०.०८ टक्के, कोल्हापूर ८९.९७ टक्के, छत्रपती संभाजीनगर ८८.६८ टक्के, नागपूर ८८.६७ टक्के आणि लातूर विभागातील ८४.१४ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विभागीय मंडळांतून नियमित मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८६.८० टक्के असून मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.१५ टक्के आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ६.३५ टक्क्यांनी जास्त आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १,४२,६९७ विद्यार्थी प्रावीण्यासह, ३,६२,०३३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ५,८१,५१९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर २,००,५९४ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी श्रेणी / गुणसुधार योजनेअंतर्गत फक्त लगतच्या तीन परीक्षांमध्ये पुन:श्च परीक्षेस प्रविष्ट होता येईल. त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या परीक्षेस प्रविष्ट होऊन सर्व विषयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना (एकाच वेळी सर्व विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या) जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७ व जून-जुलै २०२७ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस श्रेणीसुधार/ गुणसुधारसाठी प्रविष्ट होण्यास तीन संधी देण्यात येत आहेत, असे मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात

### भोकरदन तालुक्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची नवी कार्यकारणी जाहीर

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या भोकरदन तालुका शाखेची नवी कार्यकारणी दिनांक २ मे २०२६ रोजी जाहीर करण्यात आली. तालुका अध्यक्षपदी श्री त्र्यंबक अण्णा पाबळे यांची निवड करण्यात आली आहे.

या कार्यकारणीत कार्याध्यक्ष म्हणून श्री कमलाकर इंगळे, सचिव म्हणून श्री राजेंद्र दारुंटे, उपाध्यक्ष म्हणून श्री मनोज पाबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच बुवाबाजी संघर्ष कार्यवाह म्हणून श्री कृष्णा बोर्डे, विविध उपक्रम कार्यवाह म्हणून श्री शिवाजी कोरके, वैज्ञानिक जाणीवा कार्यवाह म्हणून श्री शिवाजी रोडगे, वार्तापत्र व प्रकाशन विभाग कार्यवाह म्हणून श्री गणेश सहाने आणि मानसिक आरोग्य विभाग कार्यवाह म्हणून श्री संजय खंडाळकर यांची निवड करण्यात आली आहे.

या नव्या कार्यकारणीच्या गठनावेळी निरीक्षक म्हणून राज्य कार्यकारी समिती सदस्य मधुकर गायकवाड तसेच जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गिराम उपस्थित होते.

समाजातील अंधश्रद्धा दूर करणे, भोंदूगिरी व बुवाबाजीवर आळा घालणे तसेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे या उद्देशाने समिती पुढील काळात कार्य करणार असल्याची माहिती देण्यात आली.

### ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूलचा बारावीचा सलग १०० टक्के निकाल

**जालना । प्रतिनिधी**

वखारी येथील ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूलने इयत्ता बारावी (२०२५-२६) परीक्षेत सलग शंभर टक्के निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रातील आपला दबदबा पुन्हा अधोरेखित केला आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखांमध्ये विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेचा उच्चांक राखला.

यंदाच्या निकालात विद्यार्थिनींचे विशेष वर्चस्व दिसून आले. श्रावणी राजीव बिडवे हिने ८२.६७ टक्के (४९६ गुण) मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रियंका भीमराव दराडे हिने ७५.३३ टक्के (४५२ गुण) गुणांसह द्वितीय, तर प्रांजल अरुण काळे हिने ७३ टक्के (४३८ गुण) मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यालयातील ज्ञानेश्वरी शिंदे (४३०), आदित्य पवार (४१६), प्रथमेश खराडे (४०५), दत्ता सुराशे (४००) यांच्यासह शिवानी घुले, रितेश चव्हाण, जय नागमोती, विनायक घाटे, कृष्णा मोहिते, हरिओम उबाळे, युवराज राठोड आदी विद्यार्थ्यांनीही विशेष प्राविण्य मिळवत संस्थेचा नावलौकिक वाढवला.

विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचा संस्थेवरील विश्वास या त्रिसूत्रीच्या बळावर विद्यालयाने ही यशस्वी परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धती, शिस्तबद्ध वातावरण आणि सातत्यपूर्ण शैक्षणिक नियोजन हे या यशामागील प्रमुख घटक मानले जात आहेत. विद्यालयाचे अध्यक्ष भगवानराव खैरे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत, विद्यार्थ्यांची जिद्द, मेहनत आणि चिकाटीमुळे हे यश शक्य झाले. शाळेची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखल्याचा आम्हाला अभिमान आहे, असे सांगितले. प्राचार्य अण्णाभाऊ भालमोडे यांनी, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्दीच्या जोरावर संपादन केलेले हे यश प्रेरणादायी आहे. शिक्षकांच्या अथक परिश्रमाचे हे फलित असून सर्व गुणवंत विद्यार्थी व पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन, असे नमूद केले. निकाल जाहीर होताच विद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. तर पालकांनी शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले. ज्ञानतिर्थ इंग्लिश स्कूलच्या या उज्ज्वल यशामुळे वखारी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरत आहे.

### गुंडेवाडीतील आप्पासाहेब गजर यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील गुंडेवाडी येथील रहिवासी कै. आप्पासाहेब शामराव गजर (वय ७५) यांचे शनिवार, दिनांक २ मे रोजी सकाळी ८ वाजता जालन्यातील संजीवनी हॉस्पिटल येथे उपचारादरम्यान दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, एक मुलगी व जावई असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी रविवार, दिनांक ३ मे रोजी सकाळी १० वाजता गुंडेवाडी येथे झाला.

# पैशांचा माज, सत्तेची मस्ती - राऊतांचा सरकारवर घणाघात

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात महिला आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यातच आता पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामधील नरसापूर येथील ४ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार आणि तिची निर्घृण हत्येने सर्वच हादरले. या प्रकरणी ६५ वर्षांच्या विकृताला अटक करण्यात आले आहे.

या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र संतप्त झाला आहे. या प्रकरणावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर अत्यंत तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. सरकार १५०० रुपये देऊन बहिणींचे तोंड बंद करू पाहत आहे का? असा सडेतोड सवाल संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे.

संजय राऊत यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी संजय राऊतांनी सरकारवर जोरदार टीका केली. पुण्यातील त्या दुर्दैवी मुलीची आई कदाचित या सरकारची लाडकी बहीण असेल. देवेंद्र फडणवीस तिच्या खात्यात १५०० रुपये टाकत असतील. पण त्या १५०० रुपयांच्या बदल्यात त्या बहिणीच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या करण्याचा





अधिकार तुम्ही कोणाला दिला आहे का? तुम्हाला आम्ही पैसे देतोय, त्यामुळे आता बहिणींनी तोंड बंद ठेवावे, असे हे सरकार सुचवत आहे. हा निव्वळ पैशांचा माज आणि सत्तेची मस्ती आहे, अशा शब्दात संजय राऊतांनी घणाघात केला.

यावेळी संजय राऊतांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या स्थितीवर भाष्य केले. ४ वर्षांच्या मुलीवर अत्याचार करण्याची हिंमत नराधमांमध्ये येते, कारण त्यांना कायद्याचा धाक उरलेला नाही. या सर्व परिस्थितीला थेट राज्य सरकार आणि गृहमंत्री जबाबदार आहेत. हे राज्य आता सामान्य माणसाला राहण्यालायक उरलेले नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागत आहे, असेही संजय राऊत म्हणाले.

यासोबतच संजय राऊत यांनी विरोधी पक्षांना रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले. तसेच राज्यातील महिलांनाही या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यास सांगितले. महाराष्ट्रातील माता आणि भगिनींनी आता या सरकारविरुद्ध बंड केले पाहिजे. त्यांना जाब विचारला पाहिजे. केवळ १५०० रुपयांच्या मदतीने सुरक्षेचा प्रश्न सुटणार नाही, असेही संजय राऊत यांनी सांगितले.

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नरसापूर येथे अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. या ठिकाणी एका ४ वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली. आरोपीने अत्याचार केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मुलीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी ६५ वर्षीय व्यक्तीला अटक केली आहे. हा आरोपी पीडित मुलीच्या ओळखीचाच असल्याची माहिती समोर आली आहे.

स्थानिक पोलिसांनी वेगाने हालचाली करत नराधमाला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे संपूर्ण पुणे जिल्हा आणि महाराष्ट्रभरातून संताप व्यक्त केला जात आहे. तसेच आरोपीला कठोर फाशीची शिक्षा देण्याची मागणी होत आहे. या घटनेवरून विरोधकांनी राज्यातील बिघडलेल्या कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, सत्ताधारी आणि गृहखात्यावर जोरदार टीका केली जात आहे.

## नसरापूर प्रकरणी राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची गंभीर दखल

**मुंबई । प्रतिनिधी**

नसरापूर येथे अल्पवयीन बालिकेसंदर्भात घडलेली घटना अत्यंत दुदैवी आणि संतापजनक आहे. या घटनेची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात आरोपीला कायद्याच्या चौकटीत जास्तीत जास्त शिक्षा मिळावी आणि पीडित बालिकेला न्याय मिळावा यासाठी आयोग राज्य शासनाला महत्त्वपूर्ण शिफारशी करणार आहे. या प्रकरणात न्यायप्रक्रिया जलदगतीने पार पडावी यासाठी विशेष सरकारी वकील नियुक्त करण्याची आणि सदर प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याची शिफारस करण्यात येणार असल्याची माहिती राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष संजय पुराणिक यांनी दिली आहे.

बालिकेच्या कुटुंबियांना आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच आयोगाकडून स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्क ठेवून घटनेची सविस्तर माहिती घेतली जात असून आवश्यक त्या सूचना देखील दिल्या जात आहेत.

या घटनेनंतर नागरिकांमध्ये निर्माण झालेला संताप समजण्यासारखा असला तरी कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नागरिकांनी शांतता राखावी, असे आवाहनही आयोगाचे अध्यक्ष यांनी केले आहे. बालिकेला आणि तिच्या कुटुंबियांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी आयोग सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

## चार मजली इमारतीला आग, ९ जणांचा मृत्यू

**दिल्ली । वृत्तसेवा**

दिल्लीच्या विवेक विहार भागातील एका चार मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आज (३ मे) पहाटेच्या सुमारास लागलेल्या या भीषण आगीत आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर अन्य दोघे जण जखमी झाल्याचीही माहिती आहे. एसीमध्ये सॉर्टसर्किट झाल्याने हि आग लागल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सध्या अग्निशमन दलाच्या वतीने आग पूर्णतः विझवण्याचे कार्य सुरु आहे. मात्र या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज (३ मे) पहाटे ४ वाजताच्या सुमारास इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर हि आग लागली, त्यानंतर आग विझवण्यासाठी आणि बचावकार्य करण्यासाठी अग्निशमन दलाच्या तब्बल १४ गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मात्र आगीचे लोट पाहता तोपर्यंत आग इमारतीच्या तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यापर्यंत पसरल्याचे



घटनास्थळी पोहोचल्यावर अधिकाऱ्यांना आढळून आले.

दरम्यान, इमारतीतून डझनहून अधिक लोकांना वाचवण्यात यश आल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलीय. सध्या जखमींना उपचारासाठी गुरुतेग बहादूर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दोन तासांनंतर, सकाळी ६ वाजेपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. सध्या इमारतीचे अनेक भाग जळालेले आणि सर्वात वरच्या मजल्यावरून धूर बाहेर येताना दिसत आहे. पहाटे सुमारे ४ वाजता आग लागल्याचा फोन आला. अग्निशमन दलाच्या गाड्या आणि स्थानिक पोलिसांना तात्काळ घटनास्थळी पाठवण्यात आले. आग नियंत्रणात आणायला सुमारे दोन तास लागले, त्यानंतर शोधमोहीम राबवण्यात आली, अशी माहिती शाहदराचे डीसीपी राजेंद्र प्रसाद मीना यांनी दिली आहे.

स्थानिक नगरसेवक पंकज लुथरा यांच्या माहितीनुसार, 'माहिती मिळताच मी घटनास्थळी धाव घेतली. मी नुकताच वरच्या मजल्यांवरून खाली आलो आहे. दुसऱ्या मजल्याच्या मागील भागात पाच मृतदेह आढळले. आणखी एक मृतदेह मागील भागात आणि तीन मृतदेह सर्वात वरच्या मजल्यावर आढळले. सध्या ओळख पटवणे अशक्य आहे.' आम्ही अजूनही पुढील तपास करत आहोत, परंतु डीएनए चाचणी होईपर्यंत आम्ही पीडितांचे ओळख निश्चित करू शकणार नाही. एकूण नऊ मृतदेहांची पुष्टी झाली आहे. आम्ही अजूनही अधिक लोकांचा शोध घेत आहोत. शॉर्ट सर्किटमुळे हे घडले असावे असे लोक म्हणत आहेत, परंतु घटनेच्या नेमक्या कारणाबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

## टीसीएस प्रकरणात धक्कादायक खुलासा! शीरखुर्मातून नशा देऊन महिलांचे शोषण?

**नाशिक । प्रतिनिधी**

टीसीएस कंपनीतील एका विशिष्ट धार्मिक गटाकडून महिलांचे लैंगिक शोषण आणि धर्मांतरणाच्या प्रकरणाने देश हादरला. टीसीएस सारख्या बहुराष्ट्रीय मानांकित कंपनीतील याप्रकाराविरोधात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या. प्रकरणातील एक फरार आरोपी निदा खान ही अजूनही यंत्रणांना गुंगारा देत आहे. तिचा अटकपूर्व जामीन फेटाळून न्यायालयाने दणका दिला. याप्रकरणातील चार आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणातील आरोपींचे दिल्ली बॉम्बस्फोटातील दहशतवाद्यांशी कनेक्शन असल्याचे समोर येत असतानाच अजून एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे.

नाशिक येथील टीसीएस प्रकरणात पीडितांना गुंगीकरकर औषध दिल्याचा दाट संशय यंत्रणांना आहे. त्या अनुषंगाने तपास सुरू आहे. प्राथमिक



माहितीनुसार, शीरखुर्मासारख्या गोड पदार्थातून या पीडितांना आरोपींनी नशेचा पदार्थ दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. मैत्री झाल्यानंतर या महिलांना शीरखूर्मा देण्यात आला. त्यात नशेचे पदार्थ असल्याचा दावा करण्यात येत आहे. या खुलाशाने आता खळबळ उडाली आहे.

लैंगिक शोषण करण्यासाठी पीडितांना नशेचा पदार्थ दिला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. लैंगिक शोषण करण्यासाठी पीडित महिलांना कामूक करण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जात होता. पीडित महिलांना मादक पदार्थ खाऊ घालतं लैंगिक अत्याचार केल्याचा संशय आहे. नाशिक पोलीस आता या अँगलने तपास करत आहेत.

याप्रकरणातील चार आरोपींना आरोपींना ५ मे पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या कोठडीत मांसाहारासह गुंगीकारक आणि मादक पदार्थ सेवन करण्यासाठी दिल्याचा पोलीस तपास करणार आहेत. या कोठडीत आरोपी काय कबुलीजबाब देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोपी कंपनीच्या कॅन्टीनमध्ये हिंदू देवी-देवतांबद्दल आक्षेपार्हय वक्तव्य करत असत.

तर कंपनीच्या ग्रुपवर अश्लिल शेरेबाजी करत असल्याचे चॅटिंगमधून समोर आले आहे. इतकेच नाही तर कंपनीकडून विशेष धार्मिक सूट मिळाल्याचा गैरफायदाही त्यांनी घेतल्याचे धर्मांतरणाच्या प्रयत्नातून समोर आले आहे.

## दिल्ली हादरली: न्यायाधीश अमन कुमार शर्मा यांची गळफास घेऊन आत्महत्या

**दिल्ली । वृत्तसेवा**

देशाची राजधानी दिल्लीतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सफदरजंग परिसरात न्यायाधीश अमन कुमार शर्मा यांनी गळफास घेऊन त्यांचं जीवन संपवल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे न्यायव्यवस्थेत आणि प्रशासनात खळबळ उडाल्याचं दिसतंय. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. ही घटना दक्षिण दिल्लीतील ग्रीन पार्क परिसरात घडल्याचं समजतंय. पोलिसांना पीसीआर कॉल मिळाल्यानंतर ते घटनास्थळी पोहोचले असता, अमन कुमार शर्मा यांचा मृतदेह त्यांच्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. ते कडकडडूमा कोर्टातील जिल्हा विधिक सेवा प्राधिकरणातसचिव म्हणून कार्यरत होते. पोलिसांच्या प्राथमिक तपासात कोणत्याही कटकारस्थानाचे संकेत आढळले नाहीत. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी सर्व बाजूंनी तपास केला जात आहे.

मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी




पाठवण्यात आला असून कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींची चौकशी सुरू आहे. अमन कुमार शर्मा यांनी १९ जून २०२१ रोजी दिल्ली न्यायिक सेवेत प्रवेश केला होता. त्यांनी पुण्यातील सिम्बायोसिस लॉ स्कूलमधून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले होते. ऑक्टोबर २०२५ पासून ते कडकडडूमा न्यायालयातील उत्तर-पूर्व जिल्हा विधिक सेवा प्राधिकरणात पूर्णवेळ सचिव म्हणून कार्यरत होते. या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस तपासानंतरच संपूर्ण सत्य समोर येणार आहे.

# नसरापूर अत्याचार प्रकरण: नवले पुलावर संतापाचा स्फोट, चार तास रास्ता रोको

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या चार वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करुन तिची हत्या करण्यात आल्याचा प्रकार घडला होता. १ मे रोजी ही घटना घडली होती. त्यानंतर भोर परिसरात तीव्र पडसाद उमटताना दिसले होते. राज्य सरकार आणि पोलिसांकडून आरोपीवरील कारवाईबाबत कोणतेही ठोस आश्वासन न मिळाल्यामुळे शनिवारी रात्री नसरापूरच्या ग्रामस्थांनी पिडीत मुलीचा मृतदेह घेऊन पुण्यातील नवले ब्रीजवर रास्ता रोको आंदोलन केले. त्यामुळे पुणे बंगळुरु महामार्गावरील वाहतूक तब्बल चार तास ठप्प होती. अखेर रात्री उशीरा पोलिसांनी सर्व प्रयत्न फोल ठरल्यानंतर लाठीमार करत आंदोलकांना नवले पुलावरुन पांगवले आणि हा रस्ता मोकळा केला. मात्र, पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अशाप्रकारचा कोणताही लाठीचार्ज झालाच नसल्याचे म्हटले आहे. आम्ही मृत मुलीच्या आई-वडिलांना समजावून येथून बाहेर काढल्याचा दावा अमितेश कुमार यांनी केला.

नवले पूलावर आंदोलकांनी चार ते साडेचार तास रास्तारोको केला. आम्ही मृत मुलीच्या नातेवाईकांना समजावून सांगितले. राज्य सरकार आणि पोलीस या प्रकरणात फास्ट ट्रॅकवर कारवाई करतील. आरोपपत्र लवकरात लवकर दाखल केले जाईल. मुलीचे कुटुंबीय म्हणतील, तो वकील दिला जाईल. आरोपीला लवकरात लवकर शिक्षा होईल, असे आश्वासन आम्ही पिडीत मुलीच्या कुटुंबीयांना दिल्याचे अमितेश कुमार यांनी म्हटले.



तसेच पोलिसांनी मुलीच्या आई-वडिलांसोबत कोणत्याही प्रकारचे इमोशनल ब्लॅकमेलिंग केले नाही. पोलिसांनी त्यांना मुद्दा समजावून सांगितला. परंतु, शेवटी काही लोक मुलीच्या आई-वडिलांना बाहेर पडून देत नव्हते. अशा लोकांना तेथून बाहेर काढण्यात आले आणि नंतर मुलीचे आई-वडील स्वखुशीने गाडीत बसले. नवले पुलावर कोणत्याही प्रकारचा लाठीचार्ज झाला नाही, असे अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले.

नसरापूर प्रकरणातील चिमुकलीवर शनिवारी रात्री उशिरा अखेर अंत्यसंस्कार करण्यात आले. चिमुकलीला न्याय द्या, नराधमाला फाशीची शिक्षा द्या अशी मागणी करत काल पुण्याच्या नवले पुलावर जोरदार आंदोलन करण्यात आले. आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत नवले पूल वाहतुकीसाठी मोकळा केला. आंदोलकांनी सुमारे चार तास नवले पूल रोखून धरला होता. पोलिसांनी आंदोलकांना बळाचा वापर करुन रस्त्यातून दूर केल्यानंतर या मार्गावरील वाहतूकही पूर्वपदावर आली. भोर तालुक्यातील नसरापूरमध्ये १ मे ला एका ४ वर्षांच्या चिमुकलीवर ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार करून तिची हत्या केली. याप्रकरणी पुणे शिवाजीनगर कोर्टाने आरोपी भीमराव कांबळेला ७ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, पोलिसांनी बळाचा वापर करुन आंदोलन संपवल्यानंतर आंदोलकांनी सरकार आणि प्रशासनावर टीका केली. नराधमाला फाशी झालीच पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. पोलिसांचा वापर करून आंदोलकांना हटवलं, सरकारची आम्हाला लाज वाटते, अशा शब्दात आंदोलकांनी टीका केली. दडपशाहीचा वापर करणारं हे इंग्रजांचं सरकार आहे, असेही काही आंदोलकांनी म्हटले.

## संक्षिप्त

### महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल निवडणुकीत डॉ. उज्वला कराड दहिफळे यांचा दणदणीत विजय

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित प्लास्टिक सर्जन डॉ. उज्वला कराड दहिफळे यांनी दणदणीत विजय संपादन केला आहे. त्यांच्या या विजयामुळे वैद्यकीय क्षेत्रात तसेच शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही निवडणूक दिनांक २६ एप्रिल रोजी पार पडली होती, तर त्यानंतर काल व आज मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाली. या निवडणुकीत राज्यभरातून एकूण ६० उमेदवार रिंगणात उतरले होते. अत्यंत चुरशीच्या लढतीत डॉ. उज्वला कराड दहिफळे यांनी प्रभावी कामगिरी करत मतदारांचा विश्वास जिंकत विजय मिळवला.

विजयानंतर बोलताना डॉ. उज्वला कराड दहिफळे म्हणाल्या की, हा विजय माझा एकटीचा नसून सर्व वैद्यकीय व्यवसायिकांच्या एकजुटीचा आहे. मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाचे योग्य फलित करणार असून, भविष्यात वैद्यकीय व्यवसायिकांच्या हक्कांसाठी सातत्याने लढत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. उज्वला कराड दहिफळे या छत्रपती संभाजीनगरमधील प्रख्यात प्लास्टिक सर्जन असून, वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक कार्यातही त्या सक्रिय आहेत. त्यांच्या निवडीमुळे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये मराठवाड्याचे प्रतिनिधित्व अधिक सक्षम होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

त्यांच्या या विजयाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील काळात त्या वैद्यकीय क्षेत्रातील विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### मंगू जळगाव जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

१९६० रोजी १०६ हुतात्म्यांच्या बलिदानातून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. भाषेच्या आधारावर स्वतंत्र राज्यासाठी मराठी माणसाने मोठा संघर्ष केला. हा दिवस महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, मराठी अस्मिता आणि हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा सोहळा आहे. म्हणूनच दरवर्षी १ मे रोजी राज्यभरात 'महाराष्ट्र दिन' मोठ्या उत्साहात साजरा केला जातो त्याचप्रमाणे मंगू जळगाव येथे जिल्हा परिषद शाळेमध्ये आज १ मे महाराष्ट्र दिन उत्साह साजरा झाला यावेळी वंदे मातरम ,गर्जा महाराष्ट्र माझा ,व राष्ट्रगीताने परिसरात अगदी उत्साहाचे व आनंदाचे वातावरण दिसून आले तसेच यावेळी मंगू जळगावचे भूमिपुत्र श्री कृष्णा भोकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले कृष्णा भोकरे हे या जिल्हा परिषद शाळेचे माजी विद्यार्थी असून त्यांनी मंगु जळगावचे नाव गल्ली ते दिल्ली पर्यंत नेले असून त्यांनी मंगू जळगाव जिल्हा परिषद शाळेचे नाव हे आपल्या शिक्षणाच्या माध्यमातून सर्व जिल्ह्याला दाखवून दिले.

यावेळी कृष्णा भोकरे या माजी विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले यावेळी भोकरे म्हणाले की सर्व शेतकऱ्यांनी व गावकऱ्यांनी इंग्रजी शाळा पेक्षा आपल्या मराठी शाळेला महत्त्व द्या आपली मराठी शाळा हीच आपल्या जीवनाची जडणघडण व्यवस्थित घडवते त्यामुळे प्रत्येक पालकांनी इंग्रजी शाळेत आपले मुलं न पाठवता मराठी शाळेमध्ये आपल्या मुलाचे शिक्षण घ्यावे असे यावेळी त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी मंगु जळगावचे सरपंच श्री राजू वाडेकर ,उपसरपंच अण्णासाहेब वाडेकर, शालेय समितीचे उपाध्यक्ष कृष्णा वाडेकर ,कैलास वाडेकर ,विक्रम कोकणे भीमराव यादव ,प्रकाश काका वाडेकर, रमेश वाडेकर, भरत शिंदे व सर्व शालेय समितीचे सदस्य सर्व शिक्षक ,मुख्याध्यापक, व गावकरी मंडळी उपस्थित होते

# नसरापूर प्रकरणात आरोपीचा निर्लज्ज बचाव; न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या भोर  तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिला संपवण्यात आल्याची घटना १ मे रोजी घडली. या प्रकरणातील नराधम आरोपीला पुणे न्यायालयाने ७ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. यावेळी आरोपीने स्वतःला वाचवण्यासाठी न्यायालयात एक धक्कादायक बनाव रचला, मात्र पोलिसांनी कडक युक्तिवाद केल्यानंतर त्याचा पोलीस कोठडी सुनावण्यात आली.  पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर, काही तक्रार आहे का? असे न्यायाधीशांनी विचारले. यावर आरोपीने अत्यंत निर्लज्जपणे उत्तर देत, किरकोळ भांडणातून मला या प्रकरणात गोवण्यात आले आहे, असा बचाव केला. मात्र, पोलिसांनी सादर केलेले प्राथमिक पुरावे आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेता त्याचा हा दावा फोल ठरला.

तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी न्यायालयात आरोपीच्या कोठडीची मागणी करताना महत्त्वाचे मुद्दे मांडले. आरोपीने चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे, त्या अनुषंगाने त्याची वैद्यकीय तपासणी, रासायनिक विश्लेषण तपासणी आणि सक्षमतेची चाचणी करायची आहे. आरोपीने यापूर्वीही असे गुन्हे केले आहेत का किंवा पीडितेवर आधी अत्याचार झाले आहेत का, याचा तपास करायचा आहे. ज्या शस्त्राने चिमुकलीची हत्या केली, ते शस्त्र जप्त करायचे असून साक्षीदारांचे जबाब नोंदवायचे आहेत. या गुन्ह्यात त्याला इतर कोणी मदत केली आहे का, याचीही चौकशी केली जाणार आहे, असा युक्तिवाद तपास अधिकाऱ्यांनी केला.



दुसरीकडे, या घटनेचे तीव्र पडसाद शनिवारी पुण्यातील नवले पुलावर पाहायला मिळाले. नराधमाला फाशी द्या, नाहीतर आमच्या ताब्यात द्या, अशी मागणी करत संतप्त नागरिकांनी आणि पीडितेच्या पालकांनी चिमुकलीचा मृतदेह रुग्णवाहिकेत ठेवून सुमारे चार तास रस्ता रोखून धरला होता. या आंदोलनामुळे पश्चिम बाह्यवळण मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र आंदोलक आपल्या मागणीवर ठाम होते. अखेर रात्री उशिरा पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांना पांगवले, त्यानंतर रात्री उशिरा चिमुकलीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## जालना-देऊळगाव राजा रोडवर भीषण अपघात; बोलेरोची छोटा हत्तीला जोरदार धडक; एकाचा मृत्यू तर दोन जण जखमी

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १ शुक्रवार रोजी दुपारी ४ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना-देऊळगाव राजा मार्गावरील वाघरुळ शिवारात आज भीषण अपघात घडला असून या अपघातात एकाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

जालना-देऊळगाव राजा रोडवरील वाघरुळ शिवारात भरधाव वेगातील बोलेरो गाडीने छोटा हत्ती (मालवाहू वाहन) ला जोरदार धडक दिल्याने गंभीर अपघात झाला. छोटा हत्ती वाहन क्र. चक २८ इइ १८१३ देऊळगाव राजा येथून जालन्याकडे येत असताना पाठीमागून आलेल्या बोलेरो वाहन क्र. चझ ०९ -ऋ ८९५२ हा डाक पार्सल वाहतूक करणाऱ्या वाहनाने ही धडक दिली.



धडक इतकी भीषण होती की छोटा हत्ती वाहनाने दोन पलट्या मारल्या, तर बोलेरो गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या एका हॉटेलमध्ये जाऊन घुसली. या घटनेत हॉटेलचेही मोठे नुकसान झाले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बोलेरो चालक हा नशेत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना वाहनाबाहेर काढले. तसेच बोलेरो चालकासह दोघांना संतप्त नागरिकांनी चोप दिल्याचीही माहिती आहे.

या अपघातात मुरलीधर लाहोरे (वय ५४, रा. देऊळगाव राजा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर दोन जण जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे जालन्यातील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, मयताचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जालन्यातील घाटी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.  या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## 'टीबी मुक्त भारत' अभियान झोपडपट्ट्यांपर्यंत नेण्याचा राज्यपालांचा संकल्प

**मुंबई । प्रतिनिधी**

'टीबी मुक्त भारत अभियान' मुंबईतील प्रत्येक झोपडपट्टीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शुक्रवारी लोकभवन, मुंबई येथे व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त लोकभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांनी 'टीबी मुक्त भारत - लोकभवन महाराष्ट्र उपक्रम' या विषयावरील पोस्टरचे अनावरण केले.




उपक्रमाबाबत अधिक माहिती देताना राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या देशातून क्षयरोग निर्मूलनाच्या आवाहनाशी सुसंगत असल्याचे सांगितले. मुंबईतील दाट लोकवस्तीच्या झोपडपट्ट्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

## दहा वर्षांनी रंगला मैत्रीचा मेळावा; अंतरवाली टेंभीत 'गेट-टुगेदर' उत्साहात

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक २ शनिवार रोजी दुपारी १ वाजता मिळालेल्या माहितीनुसार घनसावंगी तालुक्यातील अंतरवाली टेंभी येथील ओम शांती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या २०१५-१६ च्या दहावी बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा 'गेट-टुगेदर' कार्यक्रम उत्साहात पार पडला. तब्बल दहा वर्षांनंतर एकत्र आलेल्या मित्रमंडळींनी जुन्या आठवणींना उजाळा देत आनंदाचा अविस्मरणीय क्षण अनुभवला.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी एकमेकांविषयीची आपुलकी, जिव्हाळा आणि प्रेम व्यक्त केले. शालेय जीवनातील गमतीजमती, मित्रांसोबतचे क्षण आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांची उजळणी करत वातावरण भावनिक आणि आनंदमय झाले होते. 'गेट-टुगेदर' हा कार्यक्रम सर्वांच्या मनात कायमस्वरूपी आठवण राहावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता.



या प्रसंगी २०१५-१६ च्या बॅचला मार्गदर्शन करणारे शिक्षकही आवर्जून उपस्थित होते. अध्यक्ष व मुख्याध्यापक औटे सर, प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रशासकीय अधिकारी देशमुख सर, तसेच हमने सर, चव्हाण सर, जाधव सर, राऊत सर आणि बैजीनाथ ओझा (भाऊजी) यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या बॅचमधील अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात कार्यरत असून, काही जण सरकारी सेवेत तर काही इंजिनिअर, डॉक्टर, शिक्षक, पोलीस आदी क्षेत्रांत आपले योगदान देत आहेत. फोनद्वारे संपर्क असला तरी या स्नेहसंमेलनामुळे सर्वांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल बोडखे यांनी प्रभावीपणे केले. या स्नेहसंमेलनामुळे जुन्या आठवणींना नवसंजीवनी मिळाली असून, मैत्रीचे बंध अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## अवैध वृक्षतोडीवर वन विभागाची धडक कारवाई; ८ टन लाकूड जप्त

**भोकरदन । प्रतिनिधी**

गोपनीय माहितीच्या आधारे वन विभागाने भोकरदन शहरातील संतोषी माता मंदिर परिसरात अवैध वृक्षतोडीविरोधात मोठी कारवाई करत सुमारे ८ टन लाकूड जप्त केले आहे. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. दिनांक १ मे २०२६ रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत आंबा, निम आणि भोकर या प्रजातींच्या झाडांची विनापरवाना तोड करून त्याची अवैध साठवण व वाहतूक केल्याचे उघड झाले. वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी छापा टाकून अंदाजे ३ टन गोल इमारती लाकूड व ५ टन जळाऊ लाकूड जप्त केले.




सदर प्रकरणी महाराष्ट्र वृक्ष अधिनियम १९६४ अंतर्गत वन गुन्हा नोंद करण्यात आला असून जप्त केलेल्या लाकडाचा पंचनामा करण्यात आला आहे. संबंधितांवर कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक (छत्रपती संभाजीनगर) सुवर्णा माने आणि सहायक वनसंरक्षक (जालना) सुदाम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. वनपरीक्षेत्र अधिकारी नीता फुले यांच्या नेतृत्वात वन परिमंडळ अधिकारी योगेश डोमळे यांच्यासह वनरक्षक आनंद वरशील, संभाजी हटकर, सुदाम राठोड आणि महादेव कळमकर यांच्या पथकाने संयुक्तरीत्या ही धडक मोहीम राबवली.

वन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, वृक्षतोड किंवा वनसंपत्तीविषयी कोणतीही बेकायदेशीर कृती आढळल्यास तात्काळ माहिती द्यावी. अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार असल्याचा इशाराही विभागाने दिला आहे.

# जालनेकरांचे प्रेम आम्ही कदापि विसरणार नाही

## निरोप समारंभात अजयकुमार बन्सल आणि आयुष नोपाणी यांचे भावोद्गार

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची सायबर महाराष्ट्र राज्य (मुंबई) येथे, तर अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी यांची चंद्रपूर जिल्ह्याचे नूतन पोलिस अधीक्षक म्हणून बदली झाली आहे. या पार्श्वभूमीवर जालनेकरांच्यावतीने शुक्रवार, दि. १ मे रोजी सायंकाळी रूपम हॉलमध्ये भव्य नागरी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना श्री. बन्सल व श्री. नोपाणी यांनी जालनेकरांनी दिलेले प्रेम आणि सहकार्य आम्ही आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही, अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या.

व्यासपीठावर सत्कारमूर्तींसह उद्योजक घनश्यामदास गोयल, ज्येष्ठ रोटरियन सुनील रायठठ्ठा, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांची उपस्थिती होती.  यावेळी श्री. बंसल पुढे म्हणाले की, गेल्या अडीच-तीन वर्षांत जालनेकरांनी पोलिसांना जी मोलाची साथ दिली, ती खरोखरच प्रेरणादायी आहे. आमच्या प्रत्येक उपक्रमात येथील व्यापारी आणि उद्योजकांनी हिरीरीने सहभाग घेतला. जरी माझी बदली मुंबईला झाली असली, येता -जाता येथे भेट देईल आणि जालन्याच्या समस्या सोडवण्यासाठी मी तेथूनही नक्कीच प्रयत्नशील राहीन. जालन्याने मला जे प्रेम दिले, ते माझ्या स्मरणात कायम राहील. आयुष नोपाणी  म्हणाले की, एसपी अजयकुमार बंसल यांनी मला नेहमीच लहान भावासारखी वागणूक दिली, ज्यामुळे कामाचा उत्साह टिकून राहिला. जालना शहरात कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी जनतेचे पाठबळ खूप महत्त्वाचे ठरले. येथील मुलींना दिलेले आत्मसंरक्षणाचे धडे असोत किंवा लघु उद्योगांच्या समस्या जाणून घेणे असो, प्रत्येक पावलावर जालन्यातील नागरिकांनी आम्हाला साथ दिली. हे प्रेम आम्ही कदापि विसरू शकत नाहीत.

सुनील रायठठ्ठा यांनी पोलीस आणि जनता यांच्यातील वाढलेल्या समन्वयावर भर दिला. ते म्हणाले की, अजयकुमार बन्सल आणि आयुष नोपाणी जालन्यात आल्यापासून पोलीस दल आणि सामान्य नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ झाले आहेत. त्यांच्या कार्यकाळात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अतिशय उत्तम होती. आता कुठे जालन्यात 'अच्छे दिन' येत आहेत असे वाटत असतानाच या दोन्ही कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची झालेली बदली मनाला चटका लावणारी आहे. सतीश पंच यांनी पोलीस प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे कौतुक केले. ते म्हणाले की, शहरात जेव्हा कधी चोरीच्या घटना किंवा इतर समस्या उद्भवल्या, तेव्हा आम्ही शिष्टमंडळ घेऊन पोलीस अधीक्षकांकडे गेलो. प्रत्येक वेळी त्यांनी आमचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत समस्या मार्गी लावल्या.



यावेळी विविध संघटना आणि सेवाभावी संस्थांच्यावतीने अजय कुमार बंसल आणि आयुष नोपानी यांचा सत्कार करण्यात येऊन

गेल्या अडीच ते तीन वर्षांच्या कार्यकाळात या दोन्ही अधिकाऱ्यांनी जालना शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच  राबवलेले अनेक विधायक उपक्रम, महिला सुरक्षा, सायबर क्राईम रोखणे, नशा मुक्ती अभियान आणि अवैध धंद्यांविरुद्ध कडक मोहीम, विशेषतः शहराचे सुशोभीकरण, ट्रॅफिक नियमांची अंमलबजावणी आणि सामाजिक समरसता निर्माण करण्यात या जोडीने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला ड. सतीश तवरावाला, डॉ. धरमचंद गादिया, संजय अग्रवाल, हेमंत ठक्कर, रामनिवास गौड, डॉ. रितेश अग्रवाल, कचरूलाल कुंकुलोळ, भरत जैन, रुचिका गोयल, अनया अग्रवाल, नेहा अग्रवाल, डॉ. सुरेश साबू, डॉ. दीपक बागडिया, रवी भक्कड, उमेश बजाज, सुरेश कुलकर्णी,  संजय देशमख, उदय शिंदे, ड. मनिष राऊत, ड. महेश धन्नावत, डॉ. कैलास सचदेव, संजय लव्हाडे, दीपक पंच, पवन जोशी, अर्जुन डहाळे, किरण झारखंडे, गौरव देशमाने, डॉ. उमेश करवा यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी दोन्ही अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचलन उमेश बजाज यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार रवी भक्कड यांनी मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor  : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**